MHGA040003762017

दाखल तारीख : २९.०८.२०१७
नोंदणी तारीख : २९.०८.२०१७
निकाल तारीख : ०७.०४.२०२६
कालावधी : ०८वर्ष, ०७म.,०८दि.

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, आरमोरी, जि. गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**(पिठासीन अधिकारी श्रीमती वैशाली व्ही. चौधरी)**<br>**(न्यायनिर्णयाची तारीख :०७/०४/२०२६)**<br>**नि.फौ.मा.क्र.४२/२०१७** |
| | अपराध क्र. :६४/२०१५<br>पोलीस स्टेशन : आरमोरी |
| **तक्रारदार** | महाराष्ट्र शासन मार्फत<br>पोलीस स्टेशन, आरमोरी |
| **आरोपी** | **राकेश बाबुराव देवईकर,**<br>वय २५ वर्षे, व्यवसाय शेती व सलुन काम,<br>राह. हळदवाही, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली |

## आदेश नि.क्र.१ वर
**(दिनांक ०७ एप्रिल, २०२६ रोजी घोषित)**

प्रस्तुत प्रकरण फरार आरोपी विरुध्द भारतीय दंड संहिताचे कलम ४३५ अन्वये दंडनीय अपराधांकरीता दाखल झालेले आहे.

२. प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी वसंत उरकुडा चल्लीरवार याने दि.२२.१०.२०१५ रोजी फिर्यादी दिली की, आरोपी हा त्याचा जावाई आहे व त्याला दारु पिण्याची सवय आहे. तो नेहमी फिर्यादी व त्याचे मुलीसोबत भांडण करीत होता. तसेच तो फिर्यादीची मुलीच्या चारित्र्यावर संशय घ्यायचा. त्यामुळे फिर्यादीची मुलगी ऑगस्ट २०१५ पासुन फिर्यादीकडे राहत होती. फिर्यादीचा जावाई हा तिला घेऊन जाण्यासाठी २ ते ३ वेळा फिर्यादीकडे आला, परंतु तो त्यावेळी दारु पिऊन आला व त्यांचे सोबत भांडण केला व जिवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे फिर्यादीने त्याचे मुलीला आरोपी सोबत पाठविले नाही.

३. दि.२१.१०.२०१५ रोजी आरोपी हा मौजा नरोटी माल येथे आला असल्याचे लोकांकडुन फिर्यादीला माहित झाले. फिर्यादीच्या शेतावर अंदाजे ८ दिवसापुर्वी धानाचे

कडपा कापुन ठेवलेले होते व ते बांधणे असल्याने सकाळी ११.०० वाजता दरम्यान शेतावर काम करणेकरीता फिर्यादीची मुलगी, पत्नी व मजुर गेले असता आरोपी हा शेतावर आला व कापलेल्या धानाला आग लावली. त्यानंतर आग विझविण्यासाठी मजुर, त्याची मुलगी व पत्नीने आग विझविली व आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता तो तेथुन पळुन गेला. त्यानंतर फिर्यादी दुपारी १२.०० वाजता शेतावर गेला व त्याला सदर प्रकार माहित झाला. आरोपी पुन्हा असे करील व धानाचे कडपा जाळील म्हणुन फिर्यादी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत शेतावरच होता. त्यानंतर फिर्यादी हा घरी गेला व ६.०० वाजता त्याच्या शेतातुन आग लागल्याचा प्रकाश दिसल्याने गावातील लोक ओरडत होते. त्यानंतर मनोज मडावी याचा दिपक घुबडे याला फोन आला की, वसंत याचा धानाचा पुंजना जळत आहे व आरोपी हा तेथुन आग लाऊन पळुन गेला. त्यानंतर फिर्यादी व इतर लोक आग लागलेले धानाचे पुंजणे विझविण्यासाठी गेले असता ते पुर्ण जळालेले होते. त्यामुळे फिर्यादीचे अंदाजे ३० हजाराचे नुकसान झाले. त्यानंतर फिर्यादी, गावातील पोलीस पाटील, गावचे तंटामुक्ती अध्यक्ष, उपसरपंच आणि काही लोकांच्या मदतीने आरोपीला पकडुन पोलीस स्टेशन, आरमोरी येथे येऊन फिर्याद दाखल केली.

४. प्रस्तुत प्रकरणातील आरोपी फरार असल्यामुळे त्याच्या विरुध्द कलम २९९ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दोषारापपत्र दाखल करण्यात आले. आरोपी विरुध्द वांरवार समन्स, वारंट काढुन देखील ते तामिल करण्यात पोलीस अपयशी ठरले. आरोपीस फरार घोषित करुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ प्रमाणे पुरावे नोंदविण्याचा आदेश पारित करण्यात आला.

५. अभियोग पक्षाने एकुण ३ साक्षीदारांचा साक्षपुरावा नोंदविला. वसंत चल्लीरवार (सा.क्र.१) हा फिर्यादी आहे. त्याचे त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, आरोपी हा त्याचा जावाई आहे. घटना संध्याकाळी घडली होती. फिर्यादी हा सायंकाळी ५.०० वाजता शेतातुन घरी आला. त्यानंतर फिर्यादीच्या शेता समोर असलेला शेतातील माणुस मनोज मडावी याने दिपक घुगडेच्या मोबाईलवर फोन करुन सांगितले की, फिर्यादीच्या शेतात धनाचा पुंजणा जळत आहे. त्यानंतर तो शेतात गेला व तिथे मनोज मडावी याने सांगितले की, धानाच्या पुंजण्याला आग लाऊन आरोपी डार्लीच्या मार्गे पळाला. त्यानंतर आरोपीचा शोध घेतला असता तो डार्ली गावा जवळ सापडला, त्याला

गावात आणले. त्यानंतर आरोपीला पोलीस स्टेशनला नेले व फिर्यादीने रिपोर्ट (नि.क्र.११) दिला.

६. दिपक घुबडे (सा.क्र.२) याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, आरोपीने फिर्यादीचे धानाचे पुंजणे पेटविले होते व त्यावेळी तो त्याच्या शेतात होता. फिर्यादीचे शेत त्याच्या शेताजवळ आहे. त्यानंतर तो घरी आला व फिर्यादीला त्याबाबत माहिती दिली. मनोज मडावी (सा.क्र.३) याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, घटना संध्याकाळी घडली होती. फिर्यादीची शेती रस्त्याच्या कडेला आहे. तो त्याच्या शेतात होता व घराकडे जात असतांना फिर्यादीच्या शेता मध्ये पुंजणा पेटतांना त्याला दिसला. त्यानंतर त्याने दिपक घुबडेला फोन केला असता तो त्याचे घरी होता. त्याने दिपकला फोनवर माहिती दिली की, फिर्यादीच्या शेतात पुंजणा पेटत आहे. त्याने त्याचे साक्ष पुराव्यात सांगितले की, पुंजणा पेटवितांना त्याने कोणाला पाहिले नाही.

७. प्रकरणातील इतर साक्षीदारांना वारंवार समन्स काढण्यात आले. परंतु अभियोग पक्ष त्यांची उपस्थिती संपादित करु शकले नाही. प्रकरण ८ वर्षे जुने असल्याकारणाने अभियोग पक्षास पुरेशी संधी दिल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

८. वरील उपलब्ध पुराव्यांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी सा.क्र.१ याने सांगितले की, घटनेची माहिती सा.क्र.३ ने सा.क्र.२ च्या मोबाईलवर फोन करुन सांगितली असे आले आहे. तसेच सा.क्र.२ हा त्याचे पुराव्यात सांगतो की, घटनेच्या वेळी तो त्याच्या शेतात हजर होता व सा.क्र.३ सांगतो की, त्याला फिर्यादीच्या शेतात पुंजणा पेटतांना दिसला व त्याने सा.क्र.२ ला फोन करुन घटनेची माहिती दिली. त्यावेळी सा.क्र.२ दिपक हा त्याच्या घरी होता. सा.क्र.३ सांगतो की, पुंजणा पेटवितांना त्याने कोणालाही पाहिले नाही. त्यामुळे तिन्ही साक्षीदारांचा पुरावा हा एकमेकांच्या साक्ष पुराव्याला सुसंगत नाही. त्यामुळे कोणी घटना बघितली व कोणी कोणाला सांगितले हे साक्षीदारांच्या पुराव्यावरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द भा.दं.वि.चे कलम ४३५ अंतर्गत गुन्हा सिद्ध होण्याकरीता पुरावा अभिलेखावर उपलब्ध

नाही. तसेच फिर्यादी सा.क्र.१ ते सा.क्र.३ यांचे साक्ष पुराव्यावरुन आरोपीने गुन्हा केला हे अभियोग पक्ष संशयापलीकडे सिद्ध करु शकले नाही. त्यामुळे आरोपीला संशयाचा फायदा देण्यात येतो. आरोपी विरुध्द सबळ पुरावा उपलब्ध नसल्यामुळे तो आरोपमुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आ दे श

१. आरोपी **राकेश बाबुराव देवईकर** याला सदर प्रकरणातुन आरोपमुक्त करण्यात येते.

२. आरोपी विरुध्द काढण्यात आलेले गैरजमानती वारंट परत बोलविण्यात येते.

३. सदर प्रकरण बंद करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VAISHALI VIKAS CHOUDHARI
Date: 2026.04.07 17:05:51 +0530

स्थळ : आरमोरी (श्रीमती व्ही.व्ही. चौधरी)
दिनांकः०७.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, आरमोरी.